## प्रसिद्धी निवेदन
## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. 10 वी साठी
## राज्यस्तर परीक्षा दि. 12 नोव्हेंबर, 2017 ची निवड यादी व गुणयादीबाबत

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत 12 नोव्हेंबर 2017 रोजी घेण्यात आलेल्या **राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राज्यस्तर) इ. 10 वी** परीक्षेची **निवड यादी व शाळानिहाय गुणयादी गुरुवार दिनांक 22/03/2018 रोजी सकाळी 11.00 वाजता** जाहीर होणार आहे.

**NTS** इ. 10 वी परीक्षेसाठी राज्यातून **69020** विद्यार्थी नोंदविण्यात आले. **NTS** राष्ट्रीय परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातून परीक्षेमधून 387 विद्यार्थी कोटा एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली यांचेकडून निश्चित केला आहे. त्यामध्ये सर्वसाधारण गटातील 300, अनुसूचित जाती 58 व अनुसूचित जमाती 29 अशा एकूण 387 विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. संबंधित संवर्गातील समान गुणांचे विद्यार्थी समाविष्ट करुन 389 विद्यार्थ्यांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच संबंधित संवर्गात अपंगासाठीचे 4% आरक्षण समाविष्ट आहे. ज्या विद्यार्थ्यांची निवड जात/अपंगत्व आरक्षणातून झालेली आहे त्यांनी सदरचे प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रवेशपत्रासोबत एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली यांना सादर केल्याशिवाय त्यांची निवड कायम समजण्यात येणार नाही. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची **राष्ट्रीयस्तर परीक्षा रविवार दि. 13 मे 2018 रोजी होणार** आहे. संबंधित निवड यादीतील विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे एप्रिल 2018 च्या पहिल्या/दुसऱ्या आठवड्यात NCERT नवी दिल्ली यांच्या www.ncert.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. ही निवड यादी **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या** www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in **वेबसाईटवर गुरुवार दिनांक 22/03/2018 रोजी सकाळी 11.00 वाजल्यापासून पाहता येईल.**

**दि. 13 मे 2018 रोजी घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी खालील प्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.**

- सदर परीक्षेसाठी MAT व SAT हे दोन विषय असतील.
- सदर परीक्षेसाठी Negative Marking पध्दतीचा वापर केला जाणार नाही.

गतवर्षी महाराष्ट्रातून सदर परीक्षेत राष्ट्रीयस्तरावरील 1000 पैकी 96 विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झालेली आहे ही अभिमानास्पद बाब आहे.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1.

E:\NEW 2012\NTS+NMMS 2017-18\NTS RESULT\result declerPressnote.doc